
# मिशन IAS

## मा. श्री जे. पी. डांगेसाहेब
IAS

मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

## गौरव ग्रंथ



संपादक
प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे

# शेतकऱ्यांची मुले झालीत कलेक्टर

संपादक

प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे



# कथा माझ्या यशाची, नव्हे संघर्षाची

-प्रवीण कोल्हे

The dictionary defines success as' ... favorable termination of a venture...the degree or measure of attaining a desired end...an undertaking that succeeds or confers success...succeeding fully or in accordance with one's desires' (Babcock,1993).

जेव्हा मला मा. विलास शिंदेकडून माझ्या यशोगाथेचे पत्र मिळाले तेव्हा मी क्षणभर अंतर्मुख झालो. विचार करु लागलो. सर्वच यशस्वी लोक आपली यशोगाथा का लिहीत नाही? कदाचित संकोच अथवा अतीविनयशीलता किंवा अतीव्यस्थता ही त्यामागील कारणे असावीत. पण मला मात्र प्रदीर्घकाळ माझे वर्ग मित्र, वरिष्ठ, कनिष्ठ तसेच लाभलेला प्राध्यापक वर्ग यांच्यासोबत संवाद साधण्याची संधी मिळाली आणि हीच हा लेख लिहिण्यामागची खरी प्रेरणा होय. खरं म्हणजे हा लेख माझ्या यशापेक्षा अपयशाने मला कसे घडविले यावरच अधिक भर देतो. बर्नार्ड शॉ म्हणतात "काहीही न करता घालवलेल्या जीवनापेक्षा चुका करीत वाटचाल करणे केवळ सन्माननीयच नव्हे तर उपयुक्तही आहे." मला वाटते आपण यशापेक्षा अपयशातूनच अधिक शहाणे होतो. आपण काय करु नये यातूनच काय करावे याचा शोध घेत असतो आणि जो कधी चुकला नाही त्याला कधी यशोमार्गही सापडला नाही.

अरे हो! माझी ओळख द्यायला विसरलोच की! मी प्रवीण कोल्हे संगमनेर

येथे एका शेतकरी कुटुंबात माझा जन्म आणि तेथेच माझे संगोपन झाले. सन २००४ मध्ये अहमदनगर जिल्हयातील संगमनेर येथील अमृत वाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातून मी सिव्हील इंजिनिअर म्हणून पदवी प्राप्त केली. सन १९९९ मध्ये मी या महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि इतरांप्रमाणेच पहिल्या वर्षी मीही महाविद्यालयीन जीवनाचा पूरेपूर 'आस्वाद' घेतला. परिणाम व्हायचा तोच झाला. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या यादीत मी अव्वल क्रमांक पटकाविला. हेच माझ्या जीवनातील पहिले अपयश. याच अपयशाने मला गंभीरपणे आत्मचिंतनास प्रवृत्त केले, विधायक दृष्टी दिली. उर्वरित वर्षात मात्र प्रथम वर्षात माझ्या हातून घडलेल्या चुका मला उमजल्यात. त्यातील प्रमुख होत्या : स्वत:ची क्षमता न ओळखणे आणि आत्मविश्वासाचा अभाव. मी अनुत्तीर्ण झालो कारण मला इलेक्ट्रीकल आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग या विषयात मुळी रसच नव्हता. सिव्हिल इंजिनिअर म्हणून मला या विषयांचा काय उपयोग होईल याचा मी कधी गांभिर्याने विचारच केला नव्हता. पण जेव्हा माझ्या हे ध्यानात आलं तेव्हा माझी मानसिकता बदलली. जर पदवी मिळविण्यापूर्वी या विषयात उत्तीर्ण व्हावे ही विद्यापीठाचीच मागणी असेल तर त्यांच्या विद्वत्तेवर शंका घेणारा मी कोण? म्हणून मी पुनश्च नामांकन केले आणि याचवेळी सुदैवाने मला काही देवदूत भेटलेत. ज्यांना माझे मित्र 'टिचर' म्हणतात. त्यांच्याच मार्गदर्शनामुळे मी अभ्यासात एकाग्र झालो. मला वाटते हाच माझ्या जीवनाला कलाटणी देणारा क्षण होय. त्रागा आणि वितंडवादात वेळ घालविण्यापेक्षा मी तन्मयतेने अभ्यास केला, परिश्रम घेतले आणि ह्यावेळी मात्र मी उत्तीर्ण झालो.

प्रथम वर्षाच्या अपयशानंतर मला खरी प्रेरणा मिळाली ती डॉ. नरेंद्र जाधव (जे सध्या पुणे विद्यापीठात कुलगुरु आहेत) यांनी लिहिलेल्या 'आमचा बाप अन् आम्ही' या मराठी पुस्तकाने. दुसऱ्या वर्षात मी वर्गातून प्रथम आलो. ही जादू याच पुस्तकाची आणि हीच ए.व्ही.ओ.सी.ई. महाविद्यालयातील माझी पहिली यशस्वी वाटचाल. तिसऱ्या वर्षी मी महाविद्यालयात प्रथम तर अंतिम वर्षी विद्यापीठात सुवर्णपदकाचा मानकरी ठरलो. आतापर्यंत हेच माझ्या जीवनातील सर्वोच्च यश होते. वळून पाहतांना मागील खडतर प्रवास आठवतो तर काही निराशाजनक प्रसंगही आठवतात. पण मला वाटते निराशादेखील जीवनात आवश्यक असते. कारण ती पुढे सरसावण्यासाठी उमेद देते आणि शेवटी यशाचे निमित्त ठरते. कदाचित याच कारणामुळे

मी चार वर्षीय अभ्यासक्रम पाच वर्षात पूर्ण केला. पण वाया गेलेल्या 'त्या' वर्षाविषयी मला जराही खंत वाटत नाही. कारण त्याच वर्षाने मला भरारी घेण्याची उर्जा दिली.

अभ्यासाव्यतिरिक्त मी सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमात सहभाग घेतला. त्यासाठी मला प्रा. काकडे सरांनी प्रेरित केले. सोबतच विद्यार्थी समन्वयक म्हणून प्रशांत थोरात आणि निलेश काटे यांचे समवेत साहित्य शारदासाठी देखील काम केले. ही माझी पहिली अभ्यासेतर कामगिरी. पुढे मी एन.एस.एस. चा सचिव झालो आणि नियमित उपक्रमासोबतच १० दिवसाचा महाविद्यालयाबाहेरील हिवाळी शिबिराचा आस्वाद घेतला. हळूहळू अशा उपक्रमात मी अधिकाधिक सहभागी होऊ लागलो. थोडक्यात अंतिम वर्षात जाईपर्यंत मी महाविद्यालयातील सर्वात व्यस्त व्यक्ती म्हणून ओळखल्या जाऊ लागलो. साहित्य शारदाचा सहकारी, एन.एस.एस. चा सचिव, महाविद्यालयीन वार्षिकांकाचा प्रमुख संपादक तर महाविद्यालयाचा मुख्य सचिव अशा सर्व जबाबदाऱ्या हाताळतांना माझ्या सृजनशीलतेला खुलवणाऱ्या मर्यादांची मला जाणीव झाली. 'सृजनशीलता ही उत्स्फूर्तता आणि मर्यादा यांच्यातील तणावामुळे निर्माण होते, असा माझा विश्वास आहे. मर्यादा नदीच्या काठासारख्या असतात. त्या उत्स्फूर्ततेला विविध दिशा देतात, ज्या आपल्याला यशाकडे घेऊन जातात.' हे वर्ष माझ्यासाठी सर्वात यशस्वी आणि आनंददायी होते. जेव्हा जेव्हा मी तेव्हाची फोटो बघतो तेव्हा तेव्हा मी त्या सोनेरी दिवसाच्या आठवणीत रमून जातो.

माझी बॅच खरोखरच भाग्यवान होती. कारण पाच वर्षात आम्हाला चार कर्तुत्त्ववान प्राचार्यांचे मार्गदर्शन लाभले. प्रथम प्राचार्य डॉ. रघुविरसिंग सरांनी आमच्या अंगी शिस्त बाणवली. प्राचार्य डॉ. ए. व्ही. वलवाडे यांनी सतत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. पुढे डॉ. जे. पी. जॉर्ज सरांनी वक्तशीरपणाचा पाठ दिला. ते नेहमी दुसऱ्यांना वेळ देण्यात अधिक महत्त्व देत होते. डॉ. जॉर्ज सर हेच माझे प्रेरणास्त्रोत होय. त्यांनी मला भरभरुन मदत केली आणि शेवटी डॉ. पाटील सरांनी प्राचार्य पद भूषविले. म्हणूनच मला माझी बॅच सुदैवी होती असे वाटते, कारण आम्ही त्यांच्याकडून खूप काही शिकलो आणि त्यांची तत्त्वे जीवनात अंगिकारण्याचा प्रयत्न करु लागलो.

पदवीधर होताच मी व्यावसायिक क्षेत्रात प्रवेश केला. प्रथम पुण्यातील एका खाजगी कंपनीत मी कनिष्ठ अभियंता म्हणून रुजू झालो. साईटवर काम करीत

असतांना मला उच्चशिक्षणाचे महत्त्व जाणवू लागले. शिक्षणाने बुद्धिमत्ता विकसित होते आणि बुद्धिमुळेच माणूस इतर प्राणीमात्रांपेक्षा वेगळा ठरतो. निसर्ग आणि स्त्रोतांचा सुयोग्य वापर करुन मानवी जीवनाचे कल्याण आणि सुधारणा करण्यासाठी शिक्षणच त्याला समर्थ बनविते. आधुनिक जीवनाचा चांगुलपणा आणि पूर्णत्त्वाची किल्ली म्हणजे शिक्षण. म्हणूनच उच्च शिक्षणाची कास धरावी या हेतूने मी 'गेट' परीक्षेची तयारी करण्याचे ठरविले. सुदैवाने त्याचवेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने देखील इंजिनिअरिंग सर्व्हिस परीक्षेची घोषणा केली. मी प्राचार्य डॉ. जॉर्ज सर व श्रीमती जॉर्ज मॅडम यांच्या मार्गदर्शनात दोन्ही परीक्षांना अर्ज केला. मला आजही तो दिवस आठवतो जेव्हा मी सरांना शुल्काविषयी विचारणा केली तेव्हा ते एवढेच म्हणाले, 'Dont worry about fees, only concentrate on your study' चणचणीच्या काळात त्यांच्या या शब्दाने माझे नैतिक बळ वाढविले. सन २००५ मध्ये गेटचा निकाल लागला ज्यात मला पहिल्याच प्रयत्नात ९५.५ टक्के गुण मिळालेत. आता प्रवेशाच्या दृष्टीने संबंधित आय.आय.टी. मध्ये मुलाखतीस जाणे आवश्यक होते. महाराष्ट्राबाहेर जाण्याची माझी ही पहिलीच वेळ. मी आय.आय.टी. कानपूर येथे मुलाखत दिली आणि एम. टेक. प्रवेशासाठी निवडल्या गेलो. मी आय.आय.टी. मुंबई येथे देखील निवडल्या गेलो. पण कानपूरच्या एकंदरित कार्यप्रणालीने मी प्रभावित झालो आणि तेथेच प्रवेश घेतला. अगदी एक-दीड वर्षातच माझा निर्णय योग्य असल्याचा मला प्रत्यय आला.

कानपूरला माझी शैक्षणिक वाटचाल सुरु होताच माझ्या ध्यानात आले की, येथील बहुतेक विद्यार्थी आपापल्या विद्यापीठातील 'टॉपर' होते. अर्थातच स्पर्धा तीव्र होती. पण माझी स्पर्धा मात्र स्वत:शीच होती. कालच्यापेक्षा आज मी अधिक चांगले करण्याचाच सदैव प्रयत्न केला. उत्तमोत्तम यश म्हणजे अखंड प्रवास, मुक्काम नव्हे अशी माझी धारणा आहे. कदाचित याच विचारसरणीमुळे असावे, मी कानपूरला ट्रान्सपोर्ट इंजिनिअरिंगमध्ये व्दीतीय आलो. "मोठ्या गोष्टी साध्य करताना केवळ कृतीच नव्हे तर तशी स्वप्नही बघावी लागतात, केवळ योजनाच नव्हे तर स्वत:वर विश्वासही असावयास हवा." आय.आय.टी. कानपूरने केवळ माझा आत्मविश्वासच वाढविला नाही तर संबंधित विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त करण्याची अद्यावत विचारसरणी दिली. येथे मी अनेक जगविख्यात व्यक्तिमत्त्वाच्या संपर्कात आलो. प्रो. के. देब हे

त्यापैकीच एक. ज्यांना सन्माननीय पंतप्रधानांनी सन २००५ मध्ये 'शांतीस्वरुप भटनागर' पुरस्कार देऊन भूषविले. त्यांनीच मला 'जेनेटिक अल्गोरिदम्स्' या क्षेत्राची आवड निर्माण होण्यास प्रेरणा दिली आणि मी 'ऑप्टीमाईझेशन इन इंजिनिअरिंग डिझाईन' हा अभ्यासक्रम निवडला. अत्यंत व्यस्त जीवन असूनदेखील त्यांनी आपला तास कधी चुकविला नाही किंवा एखादा मुद्दा वारंवार समजावून देण्याचा कधी कंटाळा केला नाही.

पुढे ज्यांच्या विचारांनी मी भारावून गेलो. ते व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. ई. श्रीधरन 'द मेट्रोमॅन' एम.डी. दिल्ली मेट्रो रेल कार्पोरेशन, नवी दिल्ली येथे एका अनौपचारिक उन्हाळी शिबिरात त्यांनी दोन तास आम्हासोबत घालविले आणि एक अंतर्मुख करणारा विचार दिला नव्हे एक नवी दृष्टी दिली. 'अंधाराची कुरकुर करण्यापेक्षा दिवे पाजळा,' स्वत:सोबतच आपल्या देशाच्या विकासाकरिता देखील आपण झटायला हवे. हे त्यांचे विचार मनात रुजलेत आणि मी स्वत:ला समाधानी मानतो कारण, आपल्या देशाच्या विकासकार्यात सहभागी होण्याची संधी मला लाभली. खरोखरच तो एक महान योगायोगच होता. १४ नोव्हेंबर २००६ रोजी महाराष्ट्र इंजिनिअरिंग सर्व्हिस परीक्षेचा निकाल लागला आणि सर्वसामान्य प्रवर्गात मी महाराष्ट्रातून प्रथम आलो आणि महाराष्ट्र शासनाच्या 'वाटर रिसोर्स' विभागात मी सहायक कार्यकारी अभियंता म्हणून सेवेत रुजू झालो. मला वाटते हेच माझ्या जीवनातील सर्वोच्च यश होय. पण हे शक्य झाले ते केवळ ए.व्ही.ओ.सी.ई. महाविद्यालयातील मजबूत पायाभरणीमुळे आणि आय.आय.टी. कानपूर येथे मिळालेल्या विधायक दृष्टीमुळे. या सर्व धावपळीत मी एवढे मात्र शिकलो की, यशाची मोजदाद व्यक्ती आपल्या जीवनात कोणत्या पदावर पोचला यावर ठरत नसून त्याने यश संपादन करताना कोणत्या अडचणींवर मात केली हेच अधिक महत्त्वाचे.

कानपूरला शिकत असताना मला ए.व्ही.ओ.सी.ई. महाविद्यालयातील ते सोनेरी दिवस सतत आठवायचे. सारिका फास्ट फूड आणि अतिथगृहातील न्याहारी, अन् ढाब्यावर बघितलेले चित्रपट मी कसे बरे विसरु शकेल? वळून बघताना, या महाविद्यालयाने घालून दिलेले जाचक नियम विद्यार्थी विकासात किती महत्त्वाचे आहेत याची जाणीव होते. येथे लाभलेले प्रशिक्षण ही माझ्या जीवनाची शिदोरी आहे. खरं सांगायच झाल्यास, माझ्या दृष्टीने हे एक सर्वोत्तम महाविद्यालय आहे

आणि मला त्याचा सार्थ अभिमान आहे. तरीपण काही बाबी सांगाव्याशा वाटतात. त्यातीलच एक प्रमुख बाब म्हणजे आजी-माजी विद्यार्थ्यांचे आदान-प्रदान. माजी विद्यार्थी संस्थेचा आर्थिक स्त्रोत तर असतोच पण शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना ते वैयक्तिक मार्गदर्शन देखील करतात. आय.आय.टी. कानपूर येथे मात्र माजी विद्यार्थी हे संस्थेचे अविभाज्य अंग आहे. तेथे दरमहिन्यास आजी-माजी विद्यार्थ्यांचे सत्र आयोजित केल्या जाते. मला वाटते अशाच प्रकारची संघटना ए.व्ही.ओ.सी.ई. मध्ये असावी जी महाविद्यालय आणि माजी विद्यार्थी यामधील दुवा ठरेल.

ए.व्ही.ओ.सी.ई. महाविद्यालय महान बनविण्याचा कसोशीने प्रयत्न करणारे संस्थेचे विश्वस्थ, प्राचार्य, व्यवस्थापक, प्राध्यापक गण, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी या सर्वासर्वांचे मी मनस्वी अभिनंदन करतो. महाविद्यालयाची २५ वर्षाची ही यशस्वी वाटचाल पाहता संस्थेचे संस्थापक आदरणीय भाऊसाहेब थोरातांचे स्वप्न साकार झाल्याचे समाधान वाटते.

मी हा जो लेख प्रपंच केला तो केवळ माझ्या यशाच्या फुशारक्या मारण्यासाठी नव्हे तर चिंता, संकोच आणि न्यूनगंडाने पछाडलेल्या गरीब विद्यार्थ्यांना यापासून नवीन उत्साह व आत्मविश्वास लाभावा एवढीच माझी तळमळ.

ज्यांनी मला घडवले, प्रेरणा दिली प्रसंगी त्याग केला त्यांचा उतराई न झाल्यास मला वाटते हे मनोगत अपूर्णच राहील. माझे आई-बाबा शिवाजी आणि रोहिणी, माझे काका रावसाहेब यांच्यामुळेच मी आज इथवर येवून पोहोचलो. खरं म्हणजे कृतज्ञता व्यक्त करण्यास शब्द थिटे पडतात. माझे गुरुजन ज्यांनी मला कठोर परिश्रम आणि शिस्तिचे धडे शिकविले, प्राचार्य पार्थ चक्रवर्ती, डॉ. अनिमेश दास, माझे वर्ग मित्र आणि ज्यांनी ज्यांनी माझ्या यशात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हातभार लावला त्या सर्वासर्वांचा मी ऋणी आहे.

**स्वैर अनुवाद : मुरलीधर घाटोळ,**
अमरावती.

■